# सम्यक् प्रयत्नांद्वारे, साधनेच्या वृक्षाचे सिंचन करा

१ मे, २०१९

आत्मीय वाचकांनो,

सिद्धयोग मार्गावर मे महिना हा बाबांचा महिना असतो. श्रीगुरुमाईंनी हा महिना त्यांचे परमप्रिय श्रीगुरू, बाबा मुक्तानंदांना समर्पित केला आहे. त्या बाबांना, ज्यांनी सिद्धयोगाच्या शिकवणी प्रदान करत संपूर्ण विश्वभर यात्रा केल्या.

बाबांच्या जन्मदिनाच्या या महिन्यात त्यांच्या जीवनाचा महोत्सव साजरा करत असताना श्रीगुरुमाई आपल्याला बाबांच्या संकेतांकडे लक्ष देण्यास प्रोत्साहित करत आहेत — निसर्गातील संकेत, आपल्या ध्यानाच्या अनुभवांतील संकेत आणि आपल्या विचारातील, भावनेतील किंवा आपल्या प्रेरणेतील संकेत जे दिवसभरात अनपेक्षितपणे आपल्याला मिळतात. या महिन्यात हा बोध आपण धारण करावा यासाठी तसेच त्यातून तुमच्यासाठी कोणती समज उलगडते आहे हे पाहण्यासाठी मी तुम्हाला आमंत्रित करू इच्छिते. बाबांचे हे संकेत शोधून काढणे म्हणजे त्यांच्या कल्याणकारी तसेच नित्य उपस्थितीशी जोडले जाणे तसेच त्या उपस्थितीचा अनुभव करणेच होय. असे हे संकेत आपल्याला आपल्या साधनेत उत्साहाने पुढे जाण्यासाठी प्रेरित करतात.

आपल्याला आपल्या साधनेची उत्साहपूर्वक जोपासना करता यावी यासाठी, आणि साधना प्रगतीपथावर नेता यावी यासाठी गुरुमाई त्यांच्या संदेशातून, काही नेमकी साधने आपल्याला प्रदान करतात. ‘मधुर सरप्राइझ् २०१९’मध्ये, त्या ‘सम्यक् अर्थात् योग्य प्रयत्नाचे’ महत्त्व आणि मनाला हळुवारपणे आर्जव करून त्याच्या स्वप्रकाशाकडे सन्मुख करण्याच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करत राहणे, या गोष्टींवर विशेष जोर देतात. साधनेतील सम्यक् प्रयत्न कोणता, याचे स्पष्टीकरण श्रीगुरुमाई आपल्याला देतात आणि त्या आपल्याला असे शिकवतात की सातत्यपूर्ण अभ्यासाने, निरंतर सम्यक् प्रयत्न करत राहण्याने आपण स्वतःच्या मनाच्या तेजस्वीतेचा अनुभव घेतो.

म्हणून या महिन्यात पुन्हा गुरुमाईंच्या संदेशाचा पुन्हा अभ्यास करा आणि तुमच्या स्मृतीला उजाळा द्या की, ‘सम्यक् प्रयत्न’ यासंबंधी गुरुमाई कशा रितीने शिकवत आहेत. यानंतर, जेव्हा तुम्ही तुमच्या दैनंदिन कामकाजास लागाल, तेव्हा विविध क्षणी तुम्ही स्वतःला प्रश्न करू शकता ‘आत्ता, या क्षणी कोणता सम्यक् प्रयत्न मी करू शकतो?’

वर्ष २०१९मध्ये सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील ज्ञानसंपन्न प्रसारणांच्या माध्यमातून आपण गुरुमाईंच्या संदेशाशी पुन्हापुन्हा जोडले जात आहोत. श्रीगुरुमाईंच्या संदेशावरील ‘नवीन कथा’ व त्याबरोबरच ‘मधुर सरप्राइझ्, २०१९’करता ‘एक बार से अधिक प्रतिभागिता पैकेजेस्,’ [Multiple Participation Packages] यांच्यासह या महिन्यात वेबसाईटवर आणखीही काही गोष्टी प्रसारित होणार आहेत :

- बाबा मुक्तानंदांच्या जन्मदिन महोत्सवानिमित्त सिद्धयोग ऑडिओ सत्संग : ज्याचे शीर्षक आहे मन. प्रत्येक वर्षी मे महिन्यात आपण बाबा मुक्तानंदांच्या जन्मदिनाचा महोत्सव सिद्धयोग ऑडिओ सत्संगासह साजरा करतो. हा सत्संग १ मे ते ३१ मे पर्यंत वेबकास्टद्वारे उपलब्ध होईल. हा सत्संग मे महिन्यातील काही निर्धारित तारखांना जगभरातील सिद्धयोग आश्रमांमध्ये व ध्यानकेंद्रांमध्ये उपलब्ध राहिल.

- बाबांनी ज्या दिवशी त्यांची आध्यात्मिक आत्मकथा ‘चित्शक्ति विलास’ लिहायला सुरुवात केली, त्या दिवसाच्या स्वर्ण जयंती उत्सवाच्या निमित्ताने प्रोफेसर विलियम के. महोनी यांच्याद्वारे लिखित, ‘चित्शक्ति विलास’ या विषयावरील भाष्य.’ बाबांनी त्यांच्या अफाट औदार्यातून आणि अपार करुणेतून तारीख १२ मे, १९६९ रोजी या त्यांच्या साधनेच्या वृत्तांताचे लेखन करण्यास सुरूवात केली, जे लेखन जगभरातील हजारो साधकांच्या जीवनात परिवर्तन करत राहिले आहे.

- ‘श्रीगुरुमाई के संदेश पर अभ्यास-पुस्तिका’मधील १४-१७ ही अभ्यास-पत्रे.

- ‘शास्त्रग्रंथांमधील उद्धरणे’, जी श्रीगुरुमाईंच्या संदेशाचा अभ्यास वृद्धिंगत करतील. यामध्ये तुम्हाला श्रीमद्भगवद्गीतेतील काही श्लोक मिळतील. या शास्त्रग्रंथातील काही श्लोक श्रीगुरुमाईंनी त्यांच्या संदेशपर भाषणात उद्धृत केले आहेत आणि वर्ष २०१९मध्ये अभ्यास करण्यासाठीचा एक शास्त्रग्रंथ असा त्याचा निर्देशही त्यांनी केला आहे.

- ध्यान-सत्र ५, ज्याचे शीर्षक आहे: *The Breath Is the Pathfinder.* या प्रत्येक ध्यान-सत्राचे शीर्षक श्रीगुरुमाईंनी विशिष्ट उद्देशाने निवडले आहे. जे साधनेतील आपल्या प्रयत्नांना नवचैतन्य प्रदान करण्यासाठी आपल्याला एक साधन उपलब्ध करून देतात.

या वर्षी चांद्रतिथीनुसार बाबांचा जन्मदिवस १८ मे रोजी येतो आहे, जी हिंदू पंचांगातील वैशाख या महिन्याची पौर्णिमा आहे. प्रत्येक वर्षी बाबांच्या या महिन्यात कलेकलेने वाढत जात पूर्णचंद्र बनणाऱ्या या चंद्राचा मागोवा आपण जगभरातील निरनिराळ्या प्रदेशातून घेतच असतो. तुम्ही जिथे कुठे असाल तेथे तुम्ही काढलेले बाबांच्या चंद्राचे फोटो पाठविण्यासाठी करण्यात येणारे निमंत्रण अवश्य वाचा!

जगभरातील अनेक प्रदेशांत १२ मे, रविवार हा दिवस 'मदर्स डे' म्हणून साजरा केला जाणार आहे. हा दिवस सर्व मातांचा सन्मान करण्यासाठी असतो, ज्या माता आपल्या जीवनाचे पालनपोषण करणाऱ्या शक्ती आहेत आणि हा दिवस आहे त्यांनी त्यांच्या अपत्याच्या संगोपनादरम्यान दाखवलेल्या अपरंपार प्रेम, सहनशीलता आणि अथक प्रयत्न या गुणांचा उत्सव साजरा करण्यासाठीचा. श्रीगुरुमाई त्यांच्या संदेशातून आपल्याला शिकवतात की, हे तेच सद्‌गुण आहेत ज्यांचा उपयोग आपल्याला आपल्या साधनेत करता येऊ शकतो.

श्रीगुरुमाईंच्या संदेशाशी सक्रियतेने वचनबद्ध होत आपली साधना चालू ठेवणे ही किती आनंददायक गोष्ट आहे!

युगानयुगे संतकवींनी त्यांचे ज्ञान उदारपणे प्रदान केले आहे आणि परमेश्वराला जाणण्यासाठी साधनेचा मार्ग अनुसरण्यास ते आपणा सर्वांना प्रोत्साहित करत आले आहेत. सोळाव्या शतकाच्या मुघलकाळातील भारताचे एक संतकवी रहिम यांचा एक प्रेरणादायी दोहा प्रस्तृत करत मी तुमचा निरोप घेईन.

रहिम म्हणतात,

> एकै साधे सब सधै, सब साधे सब जाय।
> रहिमन मूलहिं सींचिबो, फूलै-फलै अघाय॥

> जेव्हा तुम्ही एकाग्र होऊन एकच कार्य साध्य करण्यात रत राहता, तेव्हा इतरही सर्व कार्ये साध्य [फलीभूत] होतील.

तुम्ही जेव्हा वृक्षाच्या मुळांचे सिंचन करता, तेव्हा त्याला पालवी फुटते व ते बहरून त्याला फुले-फळे येतात.

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.